


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०७४ ● पुणे ● बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# विद्येच्या माहेरघरात अंधश्रद्धेचा कहर!

● शाळेत गोलाकार चिन्हात लिंबू-अंडी; विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण ●



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षणाची परंपरा जपणाऱ्या पुणे जिल्ह्यातील टाकवे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अंधश्रद्धेचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शाळेच्या परिसरात लिंबू, अंडी, कुंकू, कागदाचे तुकडे ठेवून गोलाकार चिन्ह काढल्याचे सोमवारी सकाळी निदर्शनास आले. या घटनेमुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेच्या पटांगणात हे साहित्य अज्ञात व्यक्तींनी ठेवले असून, नेमके कोणत्या उद्देशाने अशा प्रकारे जादूटोणा किंवा उतारा करण्यात आला याबाबत अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी शाळा प्रशासनाकडे तक्रार केली. प्रशासनाने तातडीने ग्रामपंचायत व पोलिसांना या प्रकरणाची माहिती दिली आहे.

या प्रकरणानंतर छोट्या मुलांना शाळेच्या पटांगणात जाण्याची भीती वाटू लागली आहे. त्यामुळे शाळेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत शाळा व्यवस्थापनाने लोकांना अफवा न पसरवण्याचे आवाहन केले असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची पूर्ण खबरदारी घेत असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, याच परिसरात यापूर्वी पंचायत निवडणुकीदरम्यान लिंबांवर नावे लिहून खिळे टोचण्याचा प्रकार चर्चेत आला होता. त्यामुळे या नव्या घटनेमुळे ग्रामस्थांत पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.

## शिर्डीत वृक्षावर साईबाबांची प्रतिमा?

### अफवेनं उसळली गर्दी

शिर्डीच्या साकुरी गावात एका वृक्षाच्या खोडावर साईबाबांची प्रतिमा दिसत असल्याची अफवा सोशल मीडियावर वाऱ्यासारखी पसरली. रात्री उशिरा हा मेसेज व्हायरल झाल्यानंतर वृक्षाजवळ भक्तांची मोठी गर्दी जमा झाली. काहींनी मोबाईलवर फोटो काढले तर काहींनी दर्शन घेतल्याचे सांगण्यात येते. साई चरित्रानुसार, साईबाबा साकुरीतील या वृक्षाजवळ थांबायचे, अशी कथा सांगितली जाते. त्यामुळे अनेक नागरिकांनी याची दखल घेतली. मात्र, या प्रकारानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी अफवा पसरवण्यावर कारवाईची मागणी केली असून, प्रशासनही सावध झाल्याचे समजते.


# विश्रांतवाडीत जिलेटिन अन् वायर सापडली

## बॉम्बमध्ये वापरण्यात येणारं साहित्य सापडल्याने परिसरात दहशतीचं वातावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील विश्रांतवाडी, टिंगरेनगर येथील विद्यानगर गल्ली क्र. 8 येथील साईकृपा लॉजजवळ बॉम्बमध्ये वापरण्यात येणारे जिलेटिन व वायर आढळून आल्या आहेत. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. माहिती मिळताच विश्रांतवाडी पोलिसांनी तत्परतेने परिसर पिंजून काढला. टिंगरेनगर येथे विद्यानगर आरोग्य कोठीमधील सफाईसेविका स्वच्छतेचं काम करीत असताना या ठिकाणी मोकळ्या प्लॉटच्या पत्र्याच्या गेटजवळच्या एक पोते रस्त्यावर बाजूला ठेवलेले दिसून आले. त्या पोत्यात त्यामध्ये स्फोटक सदृश्य वस्तू असल्याचे आढळून आले.

ही माहिती पोलिसांना देण्यात आली, त्यांनी तत्परतेने शोध घेतला



असता त्यात 138 जिलेटिन कांड्या व 135 डिनोनेटर वायरसह, एकूण 10 हजार 920 रुपयांचा मुद्देमाल सापडला आहे. हे खडक फोडण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य असून ते एका बांधकाम व्यवसायिकाचे आहे. बॉम्बशोधक पथकाला पाचारण करण्यात आले असून त्यांनी मुद्देमाल ताब्यात घेऊन तपासणी केली आहे. पुढील कार्यवाही चालू आहे.

या प्रकरणी धोकादायक साहित्य हलगर्जीपणाने लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल असे ठेवल्याबद्दल राहुल सुदाम वाजे, किसन धनवते (दोघेही रा. शिरूर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार यशवंत किरवे यांनी फिर्याद दिली आहे.

गुन्हा दाखल करणारे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक ताराचंद सुडगे असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल माने करत आहेत. विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगेश हांडे यांच्या नेतृत्वाखाली तपास चालू आहे. नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही, परंतु नागरिकांनी अशा संशयास्पद वस्तू मिळाल्या, तर लगेच पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगेश हांडे यांनी केले आहे.




## ठळक बातम्या

### अतिक्रमणांवर कारवाईचा धडाका

**सोमाटणे (आरंभ पर्व) :** पवना धरण परिसरातील पाटबंधारे विभागाच्या जागेवर झालेले अतिक्रमण हटवण्याची मोठी मोहीम पुन्हा सुरू झाली आहे. आपटी आणि धामणदरा परिसरातील अतिक्रमणांवर पाटबंधारे विभागाने कारवाईला सुरुवात केली असून, दोन दिवसांत 8 बंगले जमीनदोस्त करण्यात आले आहेत. सरकारी जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले होते. या कारवाईसाठी पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी माणिक शिंदे, शाखा अभियंता रजनीश बारिया, शीतल पठारे, वैभव देशमुख यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होता.

### दोन केंद्रांवर मतदान केल्यास कारवाई

**पुणे (आरंभ पर्व) :** नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुका अवघ्या आठ दिवसांवर आल्या आहेत. राज्यभरात मतदार याद्यांमधील दुबार मतदारांच्या प्रश्नावरून वाद निर्माण झाले आहेत. त्यामुळे मतदार याद्यांमध्ये दुबार वा तिबार नावे असलेल्या मतदारांकडून हमीपत्र घेतले जाणार असून, त्यांनी एकाच मतदान केंद्रावर मतदान करणे बंधनकारक असणार आहे. अन्यथा त्यांना कायदेशीर कारवाईस तोंड द्यावे लागणार आहे. या दुबार-तिबार मतदारांकडून मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्ष हमीपत्र घेणार आहेत.






# महिलांवरील अन्याय म्हणजे पुरूषार्थ नव्हे

**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

समाजाच्या प्रगतीसोबत आपण शिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक विकास या सर्व क्षेत्रांत पुढे जात आहोत; परंतु दुर्दैवाने घराघरातल्या चार भिंतींमध्ये अजूनही अनेक महिला अत्याचार, मारहाण आणि मानसिक छळाला सामोरं जात आहेत. महिलांवर हात उचलणे, रागाच्या भरात किंवा 'पुरुष असल्याचा अधिकार' समजून मारहाण करणे - ही वृत्ती केवळ अमानवी आणि गुन्हेगारीच नाही, तर ते "पुरुषार्थ" नावाच्या संकल्पनेचा अपमान आहे.




**पुरुषार्थ म्हणजे काय?**

- खऱ्या अर्थाने पुरुषार्थ म्हणजे जबाबदारी, संयम, समजूतदारपणा आणि संरक्षण.
- पुरुषार्थ म्हणजे स्वतःवर, आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यातली ताकद.
- पुरुषार्थ म्हणजे संकटात साथ देणे, कुटुंबाला आधार देणे.

परंतु दुर्दैवाने समाजात आजही अनेकजण पुरुषार्थाची विकृत कल्पना बाळगतात - ज्यात राग, दडपशाही, भीती दाखवणे किंवा मारहाण करणं 'पुरुषीपणा' मानलं जातं. ही मानसिकता समाजाला मागे खेचणारी आहे.

**मारहाण ही केवळ कौटुंबिक समस्या नाही, तर गंभीर गुन्हा**

भारतीय कायद्यानुसार महिलांवर हात उचलणे, शारीरिक-मानसिक अत्याचार करणे, धमकावणे, आर्थिक नियंत्रण ठेवणे - हे सर्व गुन्हे आहेत.

'घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा, २००५' महिलांना संरक्षण देतो आणि अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद आहे.

अनेक वेळा बाईंचा शांतपणा किंवा सहनशीलता पाहून पुरुष चुकीच्या मार्गावर जातात. परंतु ही सहनशीलता कमजोरी नाही; ती परिस्थिती संभाळण्याची ताकद आहे. या ताकदीचा गैरफायदा घेणे समाजासाठी लज्जास्पद आहे.

**महिलांवर होणाऱ्या हिंसेची रूपे**

हात उचलणे हा त्यातील सर्वात उघड प्रकार असला तरी, अनेक नजरेआड अत्याचार रोज घडतात-

- तिरस्कारपूर्ण बोलणे
- अपमान
- शिवीगाळ
- आर्थिक नियंत्रण
- बाहेर जाण्यावरील बंदी
- मानसिक छळ
- लैंगिक जबरदस्ती

यातील प्रत्येक गोष्ट ही स्त्रीच्या अस्तित्वावर घाला आहे.

कुटुंबातील पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या चुकीच्या कल्पना

**"बाईला मारले तरच ती ताब्यात राहते", "घरातील भांडण घरातच ठेवावे", "पुरुष रागावला तर हात उचलतोच"...**

अशा असंख्य वाक्यांनी आपल्या संस्कृतीत चुकीचे संदेश रोवले गेले. घरातील मुलं–मुली हेच संस्कार बघून मोठे होतात. त्यामुळे पुरुषाने महिलेला मारणे हे 'सामान्य' मानणारी पिढी तयार होणे हे समाजासाठी मोठे संकट आहे.

**महिलेचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान**

ज्या घरांत स्त्रीला आदर आहे, तिच्या मताला किंमत आहे आणि तिच्या सुरक्षिततेची जाणीव आहे, ती घरंच नव्हे तर संपूर्ण समाज सुखी आणि सबल असतो. स्त्री सक्षम असेल तर कुटुंब सक्षम होते; आणि कुटुंब सक्षम असेल तर देश प्रगती करतो.

म्हणून स्त्रीला दुखावणे म्हणजे केवळ व्यक्तीचा अपमान नाही, तर संपूर्ण मानवतेचा अपमान आहे.

**पुरुषार्थाची खरी कसोटी – संयम आणि संवाद**

राग हा सर्वांनाच येतो. मतभेदही होतात. पण त्यावर उपाय मारहाण नाही - संवाद आहे. खऱ्या पुरुषाची ओळख त्याच्या ताकदीत नसून त्याच्या स्वभावात असते.

वाद असला तरी शांततेने बोलणे, चुकीचे वाटले तर ते मान्य करण्याची हिंमत ठेवणे, कुटुंबावर हात उचलण्याऐवजी समस्येचे समाधान शोधणे हेच पुरुषार्थाचे लक्षण.

## महिलांसाठी लढणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे कौतुक

**महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या, हिंसाचाराविरोधात उभ्या राहणाऱ्या आणि स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी दिवस-रात्र झटणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे योगदान अतुलनीय आहे. हे कार्यकर्ते फक्त एखाद्या व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा चेहरा बदलण्याचे काम करत आहेत. त्यांचा संघर्ष कठीण, कधी धोकादायक आणि अनेकदा न दिसणारा असला तरी त्यांची इच्छाशक्ती आणि धैर्य समाजाला नवी दिशा देत आहे.**

## महिला हक्कांसाठीच्या NGO/संघटना

- **भुमाता ब्रिगेड – तृप्ती देसाई**
- **मुक्तांगण महिला सहकारी संस्था – पुणे**
- **उज्ज्वला महिला संघटना**
- **आसरा फाउंडेशन**
- **स्नेहलया (अहमदनगर)**
- **प्रेरणा फाउंडेशन (मुंबई)**
- **शांतीवन संस्था (कोल्हापूर)**

**महिला स्वतःला कशी सुरक्षित ठेवू शकते?**

- अत्याचार सहन करत बसू नका - आवाज उठवा.
- विश्वासू नातेवाईक, मैत्रिणी किंवा संस्थांकडे मदत मागा.
- महिला हेल्पलाइन 1091, पोलीस 112, किंवा स्थानिक महिला बचाव केंद्राशी संपर्क करा.
- कायदेशीर मार्ग जाणून घ्या - आवश्यक असल्यास तक्रार नोंदवा.

**समाजाने काय करायला हवे?**

- अत्याचाराचा कोणताही प्रकार दिसल्यास निष्क्रिय प्रेक्षक बनू नका.
- महिलांना आधार, कायदेशीर मदत, समुपदेशन उपलब्ध करून द्या.
- लहान मुलांमध्ये स्त्री–पुरुष समानता याची योग्य मूल्ये रुजवा.
- रागावर नियंत्रण, नातेसंबंधांतील संवाद कौशल्य यावर जनजागृती वाढवा.

महिलेवर हात उचलणे हे सामर्थ्य नाही, तर असमर्थतेचे लक्षण आहे. ज्याला स्वतःच्या भावनांवर नियंत्रण नसते, तो पुरुषार्थाचा दावा करू शकत नाही. स्त्रीचा सन्मान, तिच्या स्वाभिमानाचा आदर आणि तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी - यातच खरा पुरुषार्थ दडलेला आहे.

## प्रमुख सामाजिक कार्यकर्ते

- **तृप्ती देसाई – "भुमाता ब्रिगेड"**
  महिला हक्क, मंदिर प्रवेश, लैंगिक समानतेसाठी संघर्ष.
  समाजातील भेदभावाविरुद्ध थेट कृती आणि आंदोलन.
- **पद्मश्री प्रफुल्ला ताई करमलकर (प्रफुल्ला करकरे)**
  महिलांचे पुनर्वसन, शिक्षण, स्वावलंबन, बालविवाह विरोधी उपक्रम.
  ग्रामीण भागात क्रांतिकारी काम.
- **उज्वला ताई धोत्रे (उज्ज्वला महिला संघटना)**
  घरगुती हिंसा, घटस्फोटीत महिलांना मदत, कायदेशीर मार्गदर्शन.
  कौटुंबिक अत्याचार थांबवण्यासाठी सतत जनजागृती.
- **डॉ. प्रवीण तुपे (पुणे)**
  स्त्री-पुरुष समानतेसाठी जनजागृती तसेच शोषित महिलांसाठी सक्रीय कार्य.
  महिला सुरक्षा आणि हेल्पलाइन कार्यक्रमात सक्रिय सहभाग.
- **वर्षा गायकवाड (मुंबई)**
  शिक्षा, दलित व महिला हक्क, समाजातील वंचित घटकांसाठी कार्य.
- **नयना जाधव**
  महिला सक्षमीकरण, झोपडपट्टी भागातील महिलांना आधार, उद्यमशीलतेस प्रोत्साहन.
- **रश्मी करंदीकर (IPS अधिकारी, सामाजिक उपक्रम)**
  महिलांची सुरक्षा, सायबर क्राईम, छेडछाड व अत्याचाराविरुद्ध मोहीम.
  "निर्भय कानीन," "पोलिस दादा-पोलिस ताई" सारख्या उपक्रमांमुळे प्रसिद्ध.
- **मंजुला प्रफुल्ला कर (अहमदनगर)**
  महिला हिंसेविरोधात कार्य, स्त्रियांसाठी कायदेशीर मदत.
- **सीता शिंदे (विदर्भ)**
  ग्रामीण भागात आदिवासी व दलित महिलांच्या शिक्षण आणि हक्कासाठी काम.
- **कविता भडके (सांगली/कोल्हापूर)**
  तस्करी, मानव हक्क, घरगुती हिंसा व अल्पवयीन मुलींच्या संरक्षणासाठी कार्य.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला–आळंदी बससेवा सुरू करण्यासाठी मनसेचा पुढाकार

- **शिवाजीराव मते पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाला दिले निवेदन**

**पुणे (आरंभ पर्व) :** खडकवासला परिसरातील नागरिकांची आळंदीपर्यंत थेट बससेवेची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने पीएमपीएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सतीश गव्हाणे साहेब यांची भेट घेऊन या बससेवेबाबत सविस्तर चर्चा केली. खडकवासला ते आळंदी मार्गावर शैक्षणिक संस्था, नोकरीसाठी प्रवास, धार्मिक स्थळांना भेट देणारे भाविक तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही बससेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांची वाढती गैरसोय लक्षात घेऊन गव्हाणे साहेबांनी प्रस्तावावर सकारात्मक भूमिका घेतली असून येणाऱ्या काही महिन्यांत ही बस सेवा सुरू करण्याचा विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. या भेटीदरम्यान मनसे वाहतूक सेना शहराध्यक्ष शिवाजीराव मते पाटील, हभप राजाभाऊ भूरूक आणि बाळासाहेब मंडलिक उपस्थित होते. ह्या बससेवेचा फायदा मोठ्या प्रमाणात खडकवासला व परिसरातील रहिवाशांना होणार असल्याने या प्रयत्नाचे नागरिकांमध्ये कौतुक होत आहे. मनसेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या महत्वाच्या सेवेला मार्ग मोकळा होत असून लवकरच प्रत्यक्ष बससेवा सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### राजेंद्र शिंदे यांचे निधन

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** वाफगाव येथील राजेंद्र देवराम शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, भाऊ, बहिणी असा परिवार आहे. शिंदे हे मुख्यमंत्री सचिवालयात सेवेत होते. मुंबई मंत्रालयात कार्यरत असताना त्यांचा गावशी संपर्क कायम होता. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विनोद तावडे व पांडुरंग फुंडकर यांच्या कार्यालयात सेवा केली. गेल्या वीस वर्षांपासून वाफगाव येथील होळकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांनी भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या व वेळोवेळी गरजेनुसार मदत केली. त्यांचा गावच्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात नेहमी सहभाग होता. मुबई येथील एमएमआरडीएचे सेवानिवृत्त अधिकारी उल्हास शिंदे यांचे ते बंधू होत.

### ओबेन इलेक्ट्रिकचा नागपुरात विस्तार

**नागपूर (आरंभ पर्व) :** माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये ओबेन इलेक्ट्रिकच्या ७५ व्या शोरूमचे उद्घाटन केले, जो भारतातील स्वदेशी आणि संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादकासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. या वाढीमुळे महाराष्ट्रात ओबेन इलेक्ट्रिकची उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे आणि इथे ओबेन रॉर ईझी सिग्माची मागणी वेगाने वाढत आहे. या लॉन्चसह, ओबेन इलेक्ट्रिक आता संपूर्ण महाराष्ट्रात ७ शोरूम चालवत आहे, जी नागपूर, पुणे (वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर, चिंचवड); छत्रपती संभाजीनगर (जालना रोड); आणि सोलापूर (बार्शी) येथे आहेत. कंपनीने आधीच भारतभर ७५ शोरूम आणि सर्व्हिस सेंटरपर्यंत विस्तार केला आहे.

## सिंहगड परिसरातील थोपटेवाडीत पुन्हा बिबट्याचे दर्शन



**नागरिकांमध्ये भीतीचे वातरण**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड परिसर – सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या थोपटेवाडी परिसरात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्या हालचालीचे वाढलेले प्रमाण पाहता परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वनविभागाने नागरिकांना सावधगिरीचे आवाहन करण्यात आले आहे. "रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडू नये, पाळीव जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत आणि कोणतीही हालचाल दिसताच तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा," असे वनरक्षक बळीराम वायकर यांनी सांगितले. थोपटेवाडी व सिंहगड परिसरात यापूर्वीही बिबट्याचे दर्शन झाल्याने वनविभाग परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवत असून पिंजरा लावण्याबाबतही पुढील निर्णय घेण्याची शक्यता आहे.

## अपोलो हॉस्पिटल्सचे महाराष्ट्रातील तिसरे हॉस्पिटल पुण्यात

### ४०० बेड्सची क्षमता असलेले हे हॉस्पिटल क्वाटर्नरी देखभाल सेवासुविधेसाठी प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आशियातील आघाडीची एकात्मिक आरोग्य सेवा प्रदान करणारी संस्था, अपोलो हॉस्पिटल्सने आज पुण्यातील स्वारगेट येथे आपले नवे हॉस्पिटल सुरु केले. या हॉस्पिटलची सुरुवात टप्प्याटप्प्याने होईल, सध्या २५० बेड्स उपलब्ध आहेत. राज्यातील या भागात आरोग्य देखभाल गरजांना ध्यानात ठेवून त्या पूर्ण करण्यासाठी आरोग्य सेवा क्षमता अजून जास्त वाढवण्याची अपोलो हॉस्पिटल्सची योजना आहे.




अपोलो हॉस्पिटल्स ग्रुपचे अध्यक्ष डॉ प्रताप सी रेड्डी यांनी सांगितले, "अपोलोमध्ये आमचे मिशन आहे, भारताच्या बरोबरीने संपूर्ण जगासाठी आरोग्य सेवांमध्ये परिवर्तन घडवून आणणे. 'हील इन इंडिया - हील बाय इंडिया' व्हिजनने प्रेरित होऊन आम्ही असे स्थान निर्माण करत आहोत जिथे जगभरातील लोकांना करुणा आणि सामर्थ्य यांच्या बरोबरीनेच क्लिनिकल उत्कृष्टतेचे लाभ मिळत आहेत. आमची इच्छा आहे की पुणे आणि भारतातील प्रत्येक घराघरात आरोग्य आणि आनंद यांचा निवास सदैव राहो."

अपोलो हॉस्पिटल्सने आपल्या पुढील विस्तारासाठी पुण्याची निवड केली कारण त्यांनी ओळखले की या क्षेत्रातील लोकांच्या आरोग्यसंबंधी गरजा बदलत आहेत. त्यांनी आपल्या विस्तार योजना अशा पद्धतीने बनवल्या आहेत की नवीन, प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करून शहरातील विविध लोक, समुदाय आणि संबंधित हितधारकांची ते अधिक चांगल्या प्रकारे सेवा करू शकतील. अपोलो हॉस्पिटल्सच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ प्रीता रेड्डी यांनी सांगितले, "अपोलो हॉस्पिटल्स पुणेमध्ये आम्ही क्लिनिकल उत्कृष्टता, करुणामय देखभाल आणि अथक नावीन्य यांच्या बळावर निर्माण केलेला, चार दशकांहून अधिक काळापासून चालत आलेला वारसा पुढे नेत आहोत. हे नवे हॉस्पिटल आरोग्य सेवांपर्यंत पोहोच आणि गुणवत्ता यांना पुढे नेण्याच्या आमच्या अचल बांधिलकीचे प्रतीक आहे, हे हॉस्पिटल सुरु करून आम्ही रुग्णांनी गेल्या अनेक पिढ्यांपासून आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचा सन्मान करत आहोत."

अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्राइज लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती सुनीता रेड्डी यांनी सांगितले, "आमचे पुणे हॉस्पिटल अपोलोच्या वाढत्या राष्ट्रीय विस्तारामध्ये उचलण्यात आलेले एक धोरणात्मक पाऊल आहे, जे भारतातील एका सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या आरोग्य सेवा बाजारपेठांमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जास्तीत जास्त लोकांना उच्च स्तरीय क्वाटर्नरी देखभालीचे लाभ देण्यासाठी आमची एकात्मिक आरोग्य इकोसिस्टिम शहरात आणताना आम्हाला खूप आनंद होत आहे. महाराष्ट्रात आरोग्य देखभालीचे मजबूत आणि भविष्यासाठी सज्ज नेटवर्क तयार करण्यासाठी पुण्यातील क्लिनिकल टॅलेंटसोबत सहयोग करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

# नऱ्हे–धायरी–वडगाव भागातील वाढत्या समस्या

## नागरिकांची निवडून येणाऱ्या नगरसेवकांकडून मोठी अपेक्षा

**संकलन : प्रतिक गंगणे, लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे–धायरी–वडगाव हा परिसर गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित होत आहे. नवीन इमारती, वाढती लोकसंख्या आणि व्यापारी वाढ मोठ्या प्रमाणात झाली. पण या वाढीच्या तुलनेत मूलभूत सुविधा आणि मनपाची सेवा कमी पडत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींना दररोज सामोरे जावे लागत आहे. या भागातील परिस्थिती, स्थानिकांच्या प्रतिक्रिया आणि प्रत्यक्ष पाहणी यावर आधारित एकत्रित माहिती पुढीलप्रमाणे:

**वाहतूक कोंडी आणि अपघातांची भीती सर्वात मोठी समस्या :** नवले पूल, धायरी फाटा, नरहे फाटा आणि वडगाव फाटा हे रस्ते नेहमीच गजबजलेले असतात. वाहने जास्त आणि रस्ते अरुंद असल्याने दिवसभर कोंडी होते. अनधिकृत पार्किंग, सिग्नल नसणे आणि खड्डेमय रस्ते यामुळे हा त्रास अधिक वाढतो. नवले पुल परिसरात तर गंभीर अपघातांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. वाहतूक पोलिसांकडे तक्रारी होत असल्या तरी कायमस्वरूपी उपाययोजना होताना दिसत नाहीत, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**पाणीपुरवठा आणि ड्रेनेजचा त्रास सुरूच :** काही भागात पाणी वेळेवर येत नाही. टँकरवर अवलंबून राहणे भाग पडते. ड्रेनेज लाईन वारंवार तुंबल्याने गल्ली–बोळात घाण पाणी वाहते. पावसाळ्यात तर ही समस्या गंभीर बनते. काही ठिकाणी घरांमध्येच पाणी शिरून नागरिकांच्या अडचणी वाढतात. मलनिस्सारणाची मुख्य लाईन अनेक वर्षांपासून दुरुस्त न झाल्याने समस्या वर्षानुवर्षे तशीच आहे.

**कचरा व्यवस्थापनाची ढासळलेली स्थिती :** कचरा उचलणाऱ्या गाड्या वेळेवर येत नाहीत, काही भागात कचऱ्याचे ढीग दिवसोंदिवस तसाच पडून राहतो. सुक्या–ओल्या कचऱ्याचे नियोजन योग्य नसल्याने अस्वच्छता वाढली आहे. धायरी, वडगाव आणि नऱ्हेच्या काही वसाहतींमध्ये कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नागरिकांच्या तक्रारी असूनही कचरा व्यवस्थापनात सुधारणा तितकी जाणवत नाही.



**अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था :** प्रभागातील अनेक अंतर्गत रस्ते खड्डेमय आहेत. सिमेंट रस्त्यांची कामे काही ठिकाणी अर्धवट सोडल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. मोटारसायकलस्वार आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात तर रस्ते चिखलमय होऊन वाहतूक ठप्प होते. काही वस्ती भागात अनेक वर्षांपासून रस्ते दुरुस्तीची कामे मागे पडलेली आहेत.

**अतिक्रमण आणि अनधिकृत पार्किंग यामुळे रस्ते आणखी अरुंद :** मुख्य रस्त्यांवर आणि आतील गल्ल्यांमध्ये अतिक्रमण वाढले आहे. दुकाने, हातगाड्या आणि अनधिकृत पार्किंगमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी अधिक वाढत आहे. नागरिकांनी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

आरोग्य, उद्याने, खेळाची मैदाने कमी लोकसंख्या वाढली, पण या भागात

– उद्याने
– मुलांची खेळाची मैदाने
– सरकारी रुग्णालय
– बससेवा

यांचा अभाव जाणवतो.

सार्वजनिक जागांची संख्या अत्यल्प असल्याने नागरिक नाराज आहेत. काही भागांत स्ट्रीट लाईट नसल्याने महिलांना आणि विद्यार्थ्यांना रात्री फिरणे असुरक्षित वाटते.

## काम वेळेवर होत नाही

**नाले कोसळलेले, तुंबलेले आणि घाण पाण्याने भरलेले दिसतात. पावसाळ्यात नाले उपसण्याचे काम उशिरा सुरू केल्याने पाणी रस्त्यावर येते. काही भागांत डास आणि दुर्गंधीचा त्रास वाढलेला आहे. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीमध्ये जो कोणी नगरसेवक म्हणून निवडून येईल, त्याने या सर्व समस्या प्रत्यक्ष पाहून त्यावर तात्काळ काम करावे, अशी अपेक्षा नागरिकांनी जोरदारपणे व्यक्त केली आहे.**

**लोक म्हणतात, "प्रत्येक वेळी निवडणुकीत आश्वासने दिली जातात, पण कामे अर्धवट राहतात. आता आम्हाला काम करणारा, जबाबदार आणि सतत उपलब्ध असणारा नगरसेवक हवा आहे." नऱ्हे–धायरी–वडगाव हे पुण्यातील वेगाने वाढणारे क्षेत्र असल्याने येथे दीर्घकालीन नियोजन, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि सातत्यपूर्ण कामांची गरज आहे. नागरिकांना विश्वास आहे की यावेळी निवडून येणारा प्रतिनिधी या गरजा ओळखून विकासाची गती वाढवेल.**






दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५











# संदीप पोकळे यांच्या पुढाकारातून अक्कलकोट–तुळजापूर देवदर्शन यात्रा

## आ. भीमराव तापकीर यांच्याहस्ते देवदर्शन यात्रेचा शुभारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरात श्रद्धा, आनंद आणि आपुलकीचा एक सुंदर संगम पाहायला मिळाला. धायरी येथील भाजपा नेते संदीप पोकळे यांच्या पुढाकारातून महिला भगिनींसाठी आयोजित केलेल्या अक्कलकोट–तुळजापूर देवदर्शन यात्रेचा पहिला टप्पा मोठ्या उत्साहात पार पडला. पहिल्या टप्प्यात तब्बल 1000 महिला भगिनी दर्शनासाठी रवाना झाल्या. सकाळी सहा वाजल्यापासून काळभैरवनाथ मंदिर येथे परिसरात उत्साह, भक्ती आणि आनंदोत्सवाचे माहोल होता. या लाडक्या भगिनींना शुभेच्छा देण्यासाठी खडकवासल्याचे लोकप्रिय आमदार भीमराव तापकीर, माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, शिवसेना (ठाकरे गट) नेते संदीप मते, मनसेचे नेते शिवाजीराव मते, माजी जि.प. सदस्य जयश्रीताई पोकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी महिलांना मनापासून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बोलताना आमदार तापकीर म्हणाले "संदीप पोकळे हे गेली वीस वर्षे समाजासाठी निःस्वार्थपणे काम करत आहेत. विशेषतः महिलांच्या समस्या, त्यांच्या सोयी-सुविधा, त्यांच्या आनंदासाठी ते नेहमीच तत्पर असतात. देवदर्शन यात्रेसारखा उपक्रम खरोखर कौतुकास्पद आहे. या भगिनींचे प्रेम आणि आशीर्वाद संदीप भाऊंना भरभरून मिळतील याची मला पूर्ण खात्री आहे." यानंतर आयोजक संदीपभाऊ पोकळे यांनीही अत्यंत भावनिक शब्दांत आपली भावना व्यक्त केली. ते म्हणाले "जनतेची सेवा करणे हीच माझी खरी साधना आहे. देवदर्शन यात्रेमध्ये भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद—हेच माझं खरे यश आहे. पुढील टप्प्यांमध्येही आणखी भगिनींना देवदर्शन घडवण्यासाठी मी अधिक प्रयत्न करेन. तुमचा आशीर्वाद आणि विश्वास हेच माझं सामर्थ्य आहे."

यात्रेच्या आयोजनात संदीप पोकळे मित्र परिवाराने नाश्ता जेवण, पाणी, वैद्यकीय मदत, बसव्यवस्था, विश्रांती व्यवस्था अशा सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या. प्रत्येक भगिनीला घरच्यांसारखे स्वागत मिळत असल्याने वातावरण अधिक भावनिक झाले. शिवाजीराव मते, संदीप मते, गंगाधर भडावळे यांसह उपस्थित नेत्यांनीही संदीप पोकळे यांच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

"संदीप भाऊ हे काम करणारे नेता आहेत... त्यांना लोकांचा आशीर्वाद नक्कीच लाभेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ही देवदर्शन यात्रा केवळ प्रवास नसून स्नेह, श्रद्धा, सेवा आणि समाजातील महिलांविषयीच्या आपुलकीचे एक सुंदर उदाहरण ठरली.

धायरी परिसरातील महिलांसाठी हा दिवस खरोखरच आनंदाचा, आशीर्वादाचा आणि अविस्मरणीय ठरला.

# पारदर्शक व्यवहार, विश्वासार्ह व ग्राहकाभिमुख सेवेसाठी तत्पर : उदयन माने

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांच्या हितासाठी कार्यरत दी प्रोफेशनल रिअल्टर्स ऑफ पुणे (प्रॉप) वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्षपदी उदयन माने, उपाध्यक्षपदी तनुज नगरानी व नीरज सिंग, सचिवपदी मनीष दीडमिसे, तर खजिनदारपदी मुरली रमणी यांची निवड झाली आहे. २०२५-२०२७ या कालावधीसाठी 'प्रॉप'च्या नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीमध्ये संचालक म्हणून ॲड. महेश यादव (प्रॉप ग्रोथ), दिनेश राठी (प्रशिक्षण व मेंटरशिप सर्कल्स), विक्रम मलिक (बिझनेस एक्स्चेंज व क्रॉस सेल), सारंग मद्रेवार (क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम), रवींद्र यादव (डिजिटल, पीआर व मीडिया) आणि प्रीत कोहली (इव्हेंट्स, एंगेजमेंट व नेटवर्किंग) यांची नियुक्ती झाली. मावळते अध्यक्ष दर्शन चावला, संस्थापक अध्यक्ष किशन मिलानी, खालिद मेनन सल्लागार मंडळात, तर 'एनएआर इंडिया'चे चेअरमन रवी वर्मा मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहतील.

उदयन माने म्हणाले, "पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील रिअल इस्टेट व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी 'प्रॉप' ही संस्था नॅशनल असोसिएशन ऑफ रिअल्टर्स-इंडियाशी संलग्नित आहे. पुणे हे बांधकाम क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत असलेले शहर आहे. त्यामुळे रिअल इस्टेट व्यावसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, प्रमाणित सदस्यांची डायरी आणि घर खरेदी-विक्री प्रक्रियेत ग्राहकांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी जनजागृती सत्रांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे विकसक, कायदा विशेषज्ञ आणि नियामक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होईल."

'प्रॉप'चे सर्व सदस्य 'रेरा' नोंदणीकृत असून त्यांनी 'रेरा' परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. हे सर्व सदस्य विविध शहरांत रिअल इस्टेट सेवा देण्यास सक्षम आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने मिळणाऱ्या प्रशिक्षणामुळे सदस्यांना जागतिक सर्वोत्तम पद्धतींची ओळख होते.

# पुणे ग्रॅण्ड दुर चॅलेंज स्पर्धेपूर्वी डांबरीकरणाची जोरदार कामे

- **जिल्हाधिकाऱ्यांचा रस्ता वाहतूक बंदीचा आदेश**



**सिंहगड -विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

पुणे ग्रॅण्ड दुर चॅलेंज या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेपूर्वी स्पर्धेचा मार्ग सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्यासाठी संबंधित रस्त्यांचे डांबरीकरण काम वेगाने सुरू आहे. या कामादरम्यान वाहतुकीत अडथळे निर्माण होऊ नयेत आणि स्पर्धेपूर्वीची तयारी सुरळीत पार पडावी म्हणून मा. पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता वाहतुकीसाठी तात्पुरत्या बंदीचा आदेश जारी केला असून, काम पूर्ण होईपर्यंत रस्ता बंद राहणार आहे.

रस्ते दुरुस्ती व सुरक्षिततेच्या देखरेखीसाठी वनरक्षक बळीराम वायकर, तसेच सुरक्षारक्षक नितीन गोळे, शंकर डोंगरे, गणेश सांबरे, भानुदास जोरकर, संतोष पढेर, हेमंत गोळे हे सतत निरीक्षण ठेवत आहेत.

संपूर्ण कामकाजाचे तांत्रिक समन्वय व मार्गदर्शन कार्यकारी अभियंता – सा.बा. दक्षिण विभाग, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाने नागरिकांना तात्पुरत्या वाहतूक बंदीबाबत सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.






# उत्तमनगरमध्ये होम मिनिस्टर कार्यक्रमास ऐतिहासिक गर्दी

## माजी सरपंच सुभाष भाऊ नाणेकर यांनी केले आयोजन : 'होम मिनिस्टर' कार्यक्रम भव्यदिव्य उत्साहात संपन्न





**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

उत्तमनगर परिसरात तब्बल दहा हजारांहून अधिक महिला भगिनींच्या उपस्थितीत भव्य 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. भाजप नेते व माजी सरपंच सुभाषभाऊ नाणेकर यांच्या संकल्पनेतून तसेच प्रभाग क्रमांक 33 मधील महिला भगिनींसाठी विशेषतः हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याने कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक उपक्रम, संवाद, खेळ, तसेच सहभागाच्या रंगतदार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे विजेत्यांसाठी देण्यात आलेल्या आकर्षक भेटवस्तू. यात सुजुकी ॲक्सेस स्कुटी, फ्रिज, स्मार्ट टीव्ही, मिक्सर, गॅस शेगडी, फॅन, प्रेशर कुकर, ओव्हन, ग्राइंडर, सायकली यांसह अनेक घरगुती उपयोगी वस्तूंचा समावेश होता. फोटोमध्ये दिसणाऱ्या या आकर्षक बक्षिसांमुळे महिलांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

विशेष म्हणजे सहभागी सर्व महिला भगिनींना पैठणी साडी भेट म्हणून देण्यात आली. हजारो महिलांसाठी ही विशेष भेट मिळणे हा क्षण आनंददायी ठरला. महिलांनी या कार्यक्रमाद्वारे व्यक्त केलेल्या भावना पाहता, आगामी काळात त्या सुभाष नाणेकर व भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

कार्यक्रमाला खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांनी भेट देत सहभाग नोंदवला. त्यांनी उपस्थित सर्व महिलांचे अभिनंदन करत सुभाषभाऊ नाणेकर यांच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. "लाडक्या भगिनींसाठी असा उपक्रम आयोजित करणे हे अत्यंत प्रशंसनीय आहे. सुभाष नाणेकर यांनी परिसरात लोकाभिमुख कामांचा आदर्श निर्माण केला आहे," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. महिलांसाठी स्कुटीसारख्या भेटवस्तूंची व्यवस्था करून कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण केल्याबद्दलही त्यांनी अभिनंदन केले.

या कार्यक्रमास प्रभाकर मोहोळ, आमदार भीमराव तापकीर, भाजप नेते अरुण दांगट, उमेश सरपाटील, सचिन दांगट, संतोष मते, किशोर पोकळे, निखिल धावडे, ॲड. नरसिंग लगड, दत्ताभाऊ कोल्हे, रमेशबापू गायकवाड, अनिल मते, रश्मी घुले पाटील, मनीषा मोरे, धनश्री दत्ताभाऊ कोल्हे, ममता दांगट, सविता रमेश गायकवाड यांच्यासह विविध मान्यवर, महिला कार्यकर्त्या आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.

कार्यक्रमानंतर सुभाषभाऊ नाणेकर यांनी सर्व महिला भगिनी, मान्यवर आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानत सांगितले की, महिलांच्या सन्मानासाठी, त्यांच्या सहभागाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या आनंदासाठी असे उपक्रम पुढील काळात आणखी मोठ्या प्रमाणावर राबवले जातील.






## थोडक्यात पण महत्वाचे



### श्रीक्षेत्र आळंदी : भामचंद्र बचाव कृती समितीची महत्त्वपूर्ण बैठक

खानापूर-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : श्रीक्षेत्र आळंदी येथे भामचंद्र बचाव कृती समिती तर्फे आज महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत चैतन्य महाराज कबीर यांच्या उपस्थितीत समितीच्या पुढील कार्ययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीदरम्यान भक्त मधुसूदन महाराज पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करत मार्गदर्शन केले. तसेच हरिभक्त पारायण यशवंत महाराज फाले, तात्या महाराज कोंढाळकर, ह.भ. फराळे महाराज, कराळे महाराज, भंडारा डोंगर कृती समितीचे पवार महाराज, नेवाळे महाराज, पंढरपूर येथील सेवक राम महाराज, राम गीता मंदिराचे वारकरी भक्त नाना शिंदे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. वारकरी पंथाचे सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, संत परंपरेचे संवर्धन तसेच भामचंद्र परिसरातील संरक्षणात्मक उपाययोजना यांवर बैठकीत चर्चा झाली. कार्यकर्त्यांनी समितीच्या पुढील लढ्याला सक्रीय पाठिंबा दर्शविला. बैठकीचे संयोजन ह.भ.प. श्रीकांत ज्ञानोबा जावळकर (संत कृष्णाजी बुवा महाराज जावळकर दिंडी) यांनी केले. ते महाराष्ट्र वारकरी साहित्य परिषद, पुणे हवेलीचे कार्याध्यक्ष असून वारकरी सेवेतील त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते.

### नाटंबीची देवराई संकटात; महादेव टेकडीवर बेकायदा तोड सुरू

भोर (आरंभ पर्व) : नाटंबी परिसरातील पवित्र देवराईवर संकटाचे ढग जमा झाले असून महादेवाच्या टेकडीवर मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बेकायदा वृक्षतोडीमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. देवराईसारख्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आणि धार्मिक मानल्या जाणाऱ्या परिसरात विनापरवाना झाडे तोडली जात असल्याचे उघड होताच ग्रामस्थांनी तात्काळ वनविभागाकडे धाव घेत कठोर कारवाईची मागणी केली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून टेकडी भागात रात्रंदिवस झाडे कापण्याचे प्रकार सुरू असून जंगलाचा घातक ऱ्हास होत आहे. स्थानिकांचा विश्वास आहे की ही परंपरागत देवराई केवळ श्रद्धास्थान नसून परिसराच्या जलस्रोतांपासून ते जैवविविधतेपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. प्राथमिक माहिती मिळताच वनविभागाने तपास प्रक्रिया सुरू केली आहे. दोषींना त्वरित अटक करून जंगलाचा नाश थांबवावा, तसेच देवराईचे काटेकोर संरक्षण करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पर्यावरणाचे रक्षण हे सर्वांचे कर्तव्य असल्याचे सांगत नागरिकांनी देवराई व जंगल संवर्धनासाठी एकजूट मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### ‘सिद्धी साधनेचा’ महाआशीर्वाद



पुणे (आरंभ पर्व) : सिद्धगुरुवर श्री सिद्धेश्वर ब्रह्मर्षी गुरुदेव हे तब्बल 68 दिवसांच्या महासाधने नंतर आपले दिव्य आशीर्वाद देण्यासाठी प्रथम पुण्यात येत आहेत. त्यांच्या सिद्धी साधनेच्या महाआशीर्वादाचा लाभ पुणेकरांना मिळावा यासाठी विश्व धर्म चेतना मंच,पुणे, पीसीएमसी परिवार यांच्या वतीने 'सिद्धी साधनेचा महाआशीर्वाद' या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा येत्या 29 नोव्हेंबर रोजी शनिवारी सायंकाळी 5 वाजता, वर्धमान सांस्कृतिक केंद्र, गंगाधाम, कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती आयोजक उत्तम बाठिया व सुमित चंगेडिया यांनी दिली आहे. यावेळी सिद्धगुरुवर श्री सिद्धेश्वर ब्रह्मर्षी गुरूदेव यांचे व्याख्यान देखील होणार आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मोफत पासची व्यवस्था करण्यात आली असून ते कार्यक्रमस्थळी (स्वागत कक्ष येथे )दिले जाणार आहेत. या दिव्य सोहळ्याचा जास्तीत जास्त पुणेकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

### कापूरहोळ–सासवड मार्ग डांबरीकरणासाठी १२ ते ५ दरम्यान बंद

पुणे (आरंभ पर्व) : कापूरहोळ – सासवड मुख्य रस्त्याचे डांबरीकरण सुरू असल्याने २४ नोव्हेंबर २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दररोज दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. कामकाज सुरळीत व सुरक्षित राखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. नमूद वेळेत कापूरहोळ–सासवड मार्ग पूर्णपणे बंद राहणार असल्याने नागरिकांनी प्रवासाचे नियोजन तदनुसार करावे, असे प्रशासनाने सांगितले आहे.

### पाच हजारांची लाच मागणारा पोलिस हवालदार एसीबीच्या जाळ्यात

- वाघोली पोलिस ठाण्याजवळ धडक कारवाई

पुणे (आरंभ पर्व) : वॉरंट बजावणीसाठी पाच हजार रुपयांची लाच मागणाऱ्या पोलिस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. मंगळवारी (ता. २५) दुपारी वाघोली पोलिस ठाण्याच्या परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. कारवाई झालेल्या हवालदाराचे नाव परमेश्वर माणिक पाखरे (वय ३७) असे असून ते वाघोली पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत. तक्रारदार महिलेने २०१५ मध्ये पतीविरोधात पोटगीचा दावा दाखल केला होता. त्यावर ऑक्टोबर २०२४ मध्ये न्यायालयाने महिलेला प्रतिमहिना पाच हजार रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले. मात्र पतीने तब्बल ६ लाख ७५ हजार रुपये थकविल्याने महिलेला पुन्हा न्यायालयात धाव घ्यावी लागली आणि त्यानुसार जप्तीचे वॉरंट जारी करण्यात आले. महिलेने हे वॉरंट स्वतः वाघोली पोलिस ठाण्यात जमा केले. त्याची बजावणी करण्याची जबाबदारी पाखरे यांच्याकडे होती. मात्र वॉरंट बजावण्यासाठी आणि रिपोर्ट देण्यासाठी त्यांनी तक्रारदार महिला यांच्याकडे पाच हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.








#### नऱ्हे, धायरी, वडगाव तसेच नवीन समाविष्ट गावातील

# नैसर्गिक ओढे बनले गटारगंगा

- तब्बल 392 कोटी रुपयांचे टेंडर काढून काय उपयोग
- सामाजिक कार्यकर्ते निलेश दमिष्टे यांचा प्रशासनाला सवाल



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
नऱ्हे–धायरी–वडगाव तसेच समाविष्ट 11 गावे परिसरातील नैसर्गिक ओढ्यांची अवस्था दिवसेंदिवस भीषण होत चालली असून, अक्षरशः हे ओढे ‘गटारगंगा’ बनल्याची तीव्र प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते निलेश दमिष्टे यांनी व्यक्त केली आहे. ओढ्यामध्ये पावसाळी स्वच्छ पाणी नसून थेट मैलापाणी, गटाराचे सांडपाणी आणि घाणीचा प्रवाह सुरू असल्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी, माशा, डास, घाण आणि आरोग्यधोका निर्माण झाला आहे.

दमिष्टे म्हणाले की, गटाराचे पाझर थेट आजूबाजूच्या बोअरवेल आणि विहिरींच्या पाण्यात मिसळत आहेत, ही सर्वात धोकादायक बाब आहे. नागरिक ज्या पाण्यावर जगतात, ज्या पाण्यावर शेतीतील पिके घेतली जातात तेच पाणी दूषित होत असल्याने लहान मुले, महिला, वृद्ध आणि संपूर्ण कुटुंबांचे आरोग्य धोक्यात येत आहे. “अक्षरशः उघड्यावर मैलापाणी ओढ्यात सोडले जात आहे, आणि प्रशासन मात्र डोळेझाक करत आहे,” असा संताप त्यांनी व्यक्त केला. या भागातील रहिवाशांना होणारा मनस्ताप, त्रास, दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा सामना रोजच्या जगण्याचा भाग बनला आहे. नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या तरीही काहीच कारवाई होत नसल्याने परिसरात प्रचंड नाराजी वाढली आहे.

दरम्यान, या ओढ्यांच्या स्वच्छता, दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी प्रशासनाने तब्बल 392 कोटी रुपयांचे टेंडर काढल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र एवढा प्रचंड निधी मंजूर करूनही जमिनीवर कोणतेही काम दिसत नाही, असा थेट सवाल निलेश दमिष्टे यांनी केला आहे.

“392 कोटी रुपये कुठे गेले? काम झाले कुठे? आणि जनतेला अजूनही गटाराच्या पाण्यात जगण्याची सक्ती का?” असा जाब त्यांनी प्रशासनाला विचारला आहे.

नवीन समाविष्ट गावे नऱ्हे, धायरी, वडगाव तसेच सर्व समाविष्ट भागांमध्ये परिस्थिती गंभीर होत चालली असून, नागरिकांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. “ही समस्या ताबडतोप सोडवली नाही, तर आम्ही मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यास भाग पाडले जाऊ,” असा इशाराही दमिष्टे आणि स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## शिक्षण उपनिरीक्षक लाच स्वीकारताना ACBच्या जाळ्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
ग्रामीण - पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात प्रस्ताव मंजुरीसाठी १ लाख रुपयांची लाच मागणाऱ्या शिक्षण उपनिरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) आज रंगेहाथ पकडले. पुण्यातील बंडगार्डन पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रावसाहेब भगवान मिरगणे (वय ५७), पद – शिक्षण उपनिरीक्षक, नेमणूक – विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे, रा. ग्रीनव्हील सोसायटी, हडपसर, हे लाच स्वीकारताना ताब्यात घेण्यात आलेले आरोपी अधिकारी आहेत. तक्रारदार यांच्या पत्नी सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत सहशिक्षिका असून ‘शालार्थ आयडी’ नसल्यामुळे त्या २०१६ पासून विनावेतन काम करत होत्या. शालार्थ आयडी मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचे वेतन सुरू होणार होते. हा प्रस्ताव १६ जून २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात दाखल करण्यात आला. प्रस्ताव ‘ई-ऑफिस’ प्रणालीद्वारे पुढे पाठवण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी मिरगणे यांनी तक्रारदारांकडे १ लाखांच्या लाचेची मागणी केली होती.

## अरूण आईस्क्रीम्स घेऊन आले आहेत आकर्षक आईस्क्रीम डोन्ट्स

आईस्क्रीम आवडणाऱ्या आणि कधी ही खाण्याचा आनंद घेणाऱ्यांना दिलासा आणि गारवा देणारे एक उत्तम एकत्रिकरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
या सीझनमध्ये,उत्तम गुणवत्ता असलेल्या दूध आणि क्रीम पासून आईस्क्रीम बनविण्याकरिता प्रसिद्ध असलेल्या तसेच कसाटा स्लाईस, आयकोन, आयबार, स्पायरल, बाईट्स, बॉल आईसक्रीम , आईस्क्रीम सॅन्डविच आणि पुश-अप कॉटन कॅन्डी सारख्या आगळ्या वेगळ्या आईस्क्रीम बनविण्यात अग्रगण्य असलेल्या अरूण आईक्रीम्स नी, आपली अगदी नवीन आणि आगळीवेगळी अशी श्रेणी बाजारात आणली आहे ज्याचे नाव आहे- अरूण आईसक्रीम डोनट.

या नव्या कल्पक अशा श्रेणीमुळे आईस्क्रीम जगतात सगळ्यांना आवडेल असा एक वेगळेपणा आणला आहे. एका चाव्यात खाता येईल अशी रचना असलेले हे आईस्क्रीम ग्राहकांना अपेक्षित असलेला ताजेपणा देणारं आहे ज्यामुळे आईस्क्रीम खायला आवडणाऱ्यांना त्याचा आस्वाद हवा हवासा वाटेल आणि त्यांना स्वत:कडे आकर्षित करेल. अरूण आस्क्रीम्सने केलेला हा नवीन लॉन्च म्हणजे क्लासिक ट्रीट्सची एक पुनर्कल्पना आहे जी सगळ्याच वयोगटांना आवडेल आणि रूचेल. ट्रेन्डनुसार केल्या गेलेल्या नव्या प्रयोगांमुळे आणि उत्तम गुणवत्तेमुळे ब्रॅन्ड तरूण वयोगटातील आपल्या ग्रहकांशी खोलवर जोडला गेला आहेच पण कुटुंबांना आनंद देऊन सगळ्याच पिढ्यांचा लाडका बनला आहे.



महत्वाचा भागांमधून घेतलेल्या बाजारातील चाचण्यांना अतीशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. ग्राहकांकडून आईस्क्रीम डोनटचा आगळ्यावेगळ्या चवींचे, क्रीम टेक्चरचे आणि नजरेला भावेल अशा सादरीकरणाचे कौतुक सुद्धा केले गेले आहे.

योग्य प्रमाणात आणि जीभेला आनंद देणारे, अरूण आईस्क्रीम डोनट हे कधी ही आणि कुणालाही आवडेल असे ट्रीट आहे- जे पार्टी, कौटुंबिक सोहळा किंवा अगदी शनीवार रविवारचा सुट्टीत आरामात घरी बसून आनंद आणि समाधान देणारा एक मार्ग ठरणार आहे.

परवडणाऱ्या अगदी 10 मध्ये अरूण आईस्क्रीम डोनट बेल्जियन चॉकोलेट आणि कुकी एन क्रीम फ़्लेवर/प्रकारात सगळ्याच हॅप डेली आणि अरूण आईस्क्रीम रिटेल आऊटलेटमध्ये उपलब्ध आहे.

## महिला विश्वचषक विजयाच्या औचित्याने ‘यूवा’तर्फे लिमिटेड एडिशन लॉंग बुक्स सादर

- आपल्या देशाला प्रेरणा देणाऱ्या आणि महिला क्रिकेट नव्याने परिभाषित करणाऱ्या चॅम्पियन्सना या लिमिटेड एडिशन लॉंग बुकच्या निमित्ताने दिली मानवंदना




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
2 नोव्हेंबर 2025 रोजी भारताच्या महिला क्रिकेट संघाने स्पर्धेच्या 50 वर्षांच्या इतिहासात आयसीसी महिला विश्वचषक जिंकून प्रथमच इतिहास घडवला. या ऐतिहासिक विजयाचा सन्मान करण्यासाठी नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या ‘यूवा’तर्फे ‘विमेन्स वर्ल्ड कप लॉंग बुक्स’ (ए4, 172 पृष्ठे) ही लिमिटेड एडिशन सीरिज सादर करण्यात आली आहे. या खास कलेक्शनच्या निमित्ताने संघाच्या जिद्दीचा, चिकाटीचा आणि भारतभरातील क्रिकेटप्रेमींना एकत्र आणणाऱ्या पॅशनचा गौरव करण्यात आला आहे. #TeamIndia

या अभिमानास्पद क्षणाने लाखो भारतीयांचे हृदय आनंद आणि गर्वाने भरून आले. कारण या संघाची मेहनत, चिकाटी आणि एकीमुळे देशाला हे वैभव प्राप्त झाले आहे. या सीरिजमधील प्रत्येक वहीमध्ये, आपल्या महिला चॅम्पियन्सचा आत्मविश्वास व अभिमान प्रतिबिंबित करणाऱ्या दृश्यांसह या ऐतिहासिक विजयाचा उत्साह टिपण्यात आला आहे. #YouvaGirlPower नारीशक्ती आणि सबलीकरणाचा गौरव करणाऱ्या प्रभावी दृश्यरचनेमुळे कव्हर डिझाइन उठून दिसते आणि ताकद, साहस आणि आत्मविश्वास असेल तर त्यांना कोणतेही ध्येय साध्य करणे शक्य आहे, याची तरुण वाचकांना आठवण करून देते. हे केवळ एक लॉंग बुक नाही तर चिकाटी व संघभावनेने इतिहास घडवता येतो, याचे प्रत्येक महत्त्वाकांक्षी विद्यार्थी आणि तरुणांना आठवण करून देणारे स्मरणचिन्ह आहे. #DreamBelieveAchieve

‘यूवा’चे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले, "भारतात क्रिकेट हा केवळ एक खेळ नाही तर ती भावना आहे. आपल्या महिला संघाने मिळवलेला हा ऐतिहासिक विजय म्हणजे भारतीय क्रिकेटच्या नव्या युगाची सुरुवात आहे. ‘यूवा’मध्ये आम्हाला महिला क्रिकेट संघाची ही यशस्वी कामगिरी अशा पद्धतीने साजरी करायची होती, ज्यामुळे प्रत्येक मुलीला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि मेहनत करण्याची प्रेरणा मिळेल. आमची लिमिटेड एडिशन महिला विमेन्स वर्ल्ड कप लॉंग बुक्स ही त्यांच्या यशाला दिलेली छोटीशी मानवंदना आहे आणि ताकद व साहसाला कोणत्याही सीमा नसतात याची आठवण करून देणारी आहे."

ही लिमिटेड सीरिज भारतातील आघाडीच्या स्टेशनरीच्या दुकानांमध्ये आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध आहे. या लॉंग बुक्सचे उत्तम डिझाइन आणि अर्थपूर्ण संकल्पनेमुळे या लॉंग बुक्समध्ये प्रेरणा व दैनंदिन वापर यांची परिपूर्ण सांगड घातली गेली आहे.

## स्पेक्टॅक्युलर सौदी’ मल्टी-सिटी शोकेस भारतात संपन्न



- मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, अहमदाबाद आणि हैदराबादमध्ये प्रचंड सहभाग

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, अहमदाबाद आणि हैदराबादमध्ये तीन असाधारण दिवस सांस्कृतिक शोध, सेलिब्रिटींशी संवाद आणि अखंड प्रवास ऑफर दिल्यानंतर, 'स्पेक्टॅक्युलर सौदी'चा समारोप एका उच्च, उत्साही पद्धतीने झाला, ज्यामध्ये २००,००० अभ्यागतांचे स्वागत झाले.

सौदीच्या टुरिझम ब्रँड सौदी टुरिझम अथॉरिटीच्या ग्राहक-मुखी ब्रँड 'सौदी', अरेबियामध्ये स्वागत' द्वारे आयोजित या कार्यक्रमाने कला प्रदर्शने, कॉफी आणि खजूर अनुभव, अर्दा नृत्य, अरबी कॅलिग्राफी, समर्पित सादू विणकाम कोपरा, पाककृती अनुभव आणि बरेच काही यासह बहु-संवेदी क्रियाकलापांद्वारे सौदीचा आत्मा, संस्कृती आणि आत्मा एकत्र आणला. शीराज टूर्स, ॲटलस ट्रॅव्हल्स, यात्रा, फ्लिपकार्ट + क्लिअरट्रिप, अकबर हॉलिडेज आणि मेक माय ट्रिप सारख्या प्रमुख व्यापारी भागीदारांसह, ऑन-ग्राउंड ट्रॅव्हल एंगेजमेंटला आणखी समृद्ध करते, शोकेसचे तल्लीन करणारे वातावरण वाढवते. गेल्या वर्षीच्या उल्लेखनीय पदार्पणानंतर, ‘स्पेक्टॅक्युलर सौदी 2025’ची सुरुवात करिना कपूर यांच्या विशेष उपस्थितीत झाली, ज्यांना संपूर्ण शोकेसचा सविस्तर आढावा देण्यात आला. त्यानंतर अनन्या पांडे आणि कार्तिक आर्यन यांनी आपली उपस्थिती नोंदवली, तर अर्जुन कपूर, रकुलप्रीत सिंह आणि हर्षवर्धन राणे यांनी कार्यक्रमाला अधिक ग्लॅमर आणि प्रतिष्ठेची उंची दिली. या कार्यक्रमाने पाहुण्यांना आणि सेलिब्रिटींना सौदीच्या आरशासारख्या निसर्गदृश्यांपासून वाळवंटातील संगीतपरंपरा आणि पाककला सौंदर्यापर्यंतच्या अद्वितीय अनुभवांच्या जगात नेले. मुंबईतील फिनिक्स पॅलेडियम, नवी दिल्लीतील सिलेक्ट सिटी वॉक, बेंगळुरूतील लुलु मॉल, अहमदाबादमधील नेक्सस अहमदाबाद वन मॉल आणि हैदराबादमधील सरथ सिटी मॉल येथे आयोजित या कार्यक्रमाने हजारो पर्यटक, ट्रॅव्हल ट्रेड भागीदार, प्रभावशाली व्यक्ती आणि सेलिब्रिटींना एका भव्य छताखाली एकत्र आणले.

पाच शहरांतील या भव्य शोकेसबद्दल बोलताना सौदी पर्यटन प्राधिकरणाचे APAC मार्केट्सचे अध्यक्ष अलहसन अलदब्बाघ म्हणाले, “स्पेक्टॅक्युलर सौदीच्या भारतातील पुनरागमनामुळे आपल्या दोन्ही देशांमधील सखोल सांस्कृतिक नातेसंबंध अधिक दृढ झाले आहेत.

## प्रभाग ३४च्या सर्वांगीण विकासाचा संकल्प

# सौ. प्रीतीताई बापूसाहेब पोकळे




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नऱ्हे–धायरी–वडगाव प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचा मोठा संकल्प आम्ही केला आहे. प्रभागातील प्रत्येक नागरिकाच्या सुख–सुविधा, सुरक्षितता आणि भविष्यासाठी काम करणे हेच माझे ध्येय आहे, असे संकल्प फाउंडेशनच्या कार्याध्यक्ष सौ. प्रीतीताई बापूसाहेब पोकळे पाटील यांनी दैनिक आरंभपर्व पुणेशी संवाद साधताना सांगितले.

मिशन महानगरपालिका संवाद मालिकेमध्ये त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

भारतीय जनता पक्षाकडून त्या प्रभाग क्रमांक 34 मधून इच्छुक असून, शांत स्वभाव, संयमी वागणूक आणि लोकांशी मनाने जोडलेला संबंध यामुळे त्या आज प्रभागातील विश्वासार्ह नेत्या ठरल्या आहेत. महिलांशी असलेले आपुलकीचे नाते आणि मातृत्वमय वागणुकीमुळे त्या महिला भगिनींच्या लाडक्या प्रीतीताई अशा नावानेही ओळखल्या जात आहेत.

अलीकडेच प्रीतीताईंनी आयोजित केलेल्या ‘होम मिनिस्टर’ कार्यक्रमात हजारो महिला भगिनींचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. या कार्यक्रमामुळे प्रीतीताईंची लोकप्रियता आणखी वाढली असून प्रभागातील महिलांनी त्यांच्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. महिलांच्या समस्या समजून घेऊन त्यांना प्राधान्य देत केलेल्या कार्यामुळे त्या प्रभागातील महिला वर्गासाठी आदर्श नेतृत्त्व बनल्या आहेत.

आजपर्यंत त्यांनी प्रभागात बालयात्रा, महिलांसाठी देवदर्शन सहली, पर्यटन सहली, आरोग्य शिबिरे, स्वच्छता उपक्रम आणि सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यांच्या प्रत्येक उपक्रमात सेवा भाव, प्रामाणिकपणा आणि नागरिकांसाठी असलेली काळजी दिसून येते.



त्यांच्या कार्यामागे मोठी साथ आहे ती त्यांच्या पतींची. खडकवासला विधानसभा भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे पाटील यांनी जनसेवेला प्राधान्य देत प्रभागात अनेक विकासकामे उभी केली आहेत. अडचणी तत्परतेने सोडवण्याच्या त्यांच्या शैलीमुळे त्यांच्यावरही लोकांचा मोठा विश्वास आहे.

“बापूसाहेबांच्या मार्गदर्शनाने आणि सोबतीने प्रभागाचा विकास जलदगतीने करू. प्रभागातील सर्व समस्या सोडवणे हेच आमचे ध्येय आहे,” असे सौ. प्रीती पोकळे यांनी नमूद केले.

पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, रस्त्यांची अवस्था, ड्रेनेज आणि पावसाळी लाईन यांसारख्या प्रभागातील मूलभूत समस्यांवर काम करण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत. आमदार भीमराव तापकीर यांचे मार्गदर्शन आणि भारतीय जनता पक्षाची विकासाभिमुख भूमिका मिळून हा प्रभाग अधिक सक्षम करणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रीतीताई म्हणाल्या, “या प्रभागातील महिलांना सुरक्षितता, मुलांना चांगले वातावरण, वृद्धांना आदर आणि प्रत्येक घराला सुविधा मिळाव्यात... एवढाच माझा संकल्प आहे. नागरिकांनी दाखवलेला प्रेम आणि विश्वास मी आयुष्यभर जपणार आहे.”

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.